छात्रालय

साने गुरुजी

छात्रालय

साने गुरुजी

सायली प्रकाशन, अमळनेर

प्रकाशक : सौ. विद्या चेतन
सायली प्रकाशन,
धुळे रोड, अमळनेर ४२५४०१

सर्वहक्क : प्रकाशकाधीन

आवृत्ती : मार्च, १९९७

मुखपृष्ठ : सुशील जडे

अक्षरजुळणी : ब्राईट कॉम्प्युटर सेंटर
६२, जयहिंद कॉलनी,
देवपूर, धुळे

मुद्रण : श्री समर्थ साई मुद्रण
४२६, सोमवार पेठ, बरके आळी,
पुणे ४११ ००१.

मूल्य : रुपये २०/-

थोडेसे प्रास्ताविक

पू. साने गुरुजी अमळनेरच्या प्रताप विद्यालयात शिक्षक असतांना हायस्कूलच्याच आवारात राहात. विद्यार्थ्यांच्या छात्रालयाची देखभाल करण्याचे काम पू.साने गुरुजीवर सोपविलेले होते. गुरुजी आपल्या विद्यार्थी - शिक्षकांसाठी.

'छात्रालय' या नावाचे दैनिक हस्तलिखित स्वरुपात प्रसिध्द करीत असत. पू. साने गुरुजी 'साधना' चे संपादक झाले. त्यांच्या या कर्तुत्वाचे बीज 'छात्रालय' दैनिकाच्या संपादनात आढळेल.

१९२८-२९ सालात प्रसिध्द झालेल्या या'छात्रालया' ची जीर्ण पृष्ठे भोपाळ येथील नामवंत, नुकतेच दिवंगत झालेले कै. प्रा. ना. ल. वैद्य यांचे संग्रही होती. त्यांचे नुकतेच साने गुरुजी चरित्र प्रकाशीत झाले असून,त्या पुस्तकात असा बहूमोल मजकूर

मूळ स्वरुपात जतन करुन ठेवल्याचे नमूद केले आहे. त्यांना विनंती करताच गुरुजींच्या हस्ताक्षरातील

मूळ प्रती हाती आल्या आणि त्यातूनच हे पुस्तक सिध्द होत आहे. याचे खरे सर्व श्रेय कै.प्रा.ना.ल.वैद्य यांना आहे. त्यांनी प्रस्तावना लिहिण्याचेही ठरले असतांना काळाने त्यांना हिरावून नेले. ही खंत मनास लागून राहिली आहेच.

यापूर्वी प्रकाशीत न झालेल्या गुरुजींचे लेखन या निमित्ताने प्रकाशित करण्याची संधी सायली प्रकाशनास मिळते आहे, हे फार मोठे समाधान आहे.

प्रकाशक

॥ १ ॥ गॅलिलिओ यांचे चरित्र

गॅलिलिओ हा युरोपमधील अत्यंत मोठा शास्त्रज्ञ होऊन गेला याचा जन्म १५६४ मध्ये इटाली देशात पिसा या गावी झाला. लहानपणापासून तो नीट निरीक्षण करणारा होता. जे जे पहावे त्याचे कारण काय हे तो पहात असे. त्याची जिज्ञासा जबर होती. मनाच्या या जिज्ञासा शक्तीमुळे त्याला पुष्कळ शास्त्रीय शोध लावता आले.

बालपणापासून त्याला गणिताची आवड होती. पिसा या विश्वविद्यालयांत चार वर्षे शिकून वयाच्या फक्त २२ वे वर्षी तो त्याच विश्वविद्यालयात गणिताचा अध्यापक झाला; येथे शिकवत असता एक दिवस तो प्रार्थना मंदिरातून परत येत होता. प्रार्थना मंदिरात एक टांगलेला दिवा होता व तो पुढे मागे हलत होता. त्याची पुढे मागे जाण्याची गती सारखी पाहून त्याच्या मनात असे आले की या युक्तीने आपणास वेळ मोजण्याचे काही साधन निर्माण करिता येईल. त्याच्याने स्वस्थ बसवेना. घरी प्रयोग शाळेत त्याने एक चाकाच्या साहाय्याने घडयाळ तयार केले. आणखी सर्वांना याचा फायदा होई.

पिसा येथे एक उंच झुलता मनोरा होता. या मनोऱ्यावर चढून त्याने निरनिराळ्या वस्तु पिसें, कागद, चाकू वगैरे खाली टाकून पाहिले व त्यावरुन त्याने गतिशा तले हल्लीचे नियम शोधून काढले.

एका डच मनुष्याने एक दुर्बीण तयार केली आहे व तिच्या साहाय्याने लांबची वस्तु जवळ दिसते असे त्याने १६०८ मध्ये ऐकले. जी गोष्ट डच मनुष्यास करिता येते ती आपणास का करिता येणार नाही असे त्याच्या बुध्दीस वाटले व तो दुर्बीण तयार करण्याच्या कामास लागला. एकदा एक वेड मनात भरले म्हणजे त्याच गोष्टीचा विचार पुरवावयाचा हा तर मोठया पुरुषांचा विशेष होय. रात्रंदिवस या दुर्बिणीच्या साहाय्याने तो आकाशातील ग्रहांचे वेड घेऊ लागला. ज्यावेळेस दूर अंतरावर असलेले ग्रहाच्या जवळ आल्यासारखे वाटले, त्यावेळेस तो आनंदाने उडया मारु लागला. यश आले म्हणजे साहजिकच मनुष्यास आनंद होतो.

या दुर्बिणीच्या साहाय्याने गॅलिलिओने पुष्कळ शोध लाविले. चंद्रावरचे डाग दिसतात, ते डाग नसून चंद्रावरील ते पर्वत आहेत असे त्याने जाहीर केले. आकाशगंगा म्हणजे एक आकाशाचा पट्टा असा त्यावेळेस सर्वत्र समज झालेला होता. गॅलिलिओने सांगितले, हा आकाशपट्टा असंख्य ताऱ्यांचा एक संग्रह आहे. हे तारे फार लहान व फार दूर आहेत. शुक्र व इतर ग्रह यांसही उपग्रह आहेत व ज्या प्रमाणे पृथ्वी सूर्याभोवती फिरते, त्याप्रमाणे हे उपग्रह या मुख्य ग्रहाभोवती फिरतात असे त्याने प्रसिध्द केले. त्यावेळी विद्वान लोकांची खात्री होती की, निदान सूर्य तरी स्थिर आहे. परंतु गॅलिलिओ याने सिध्द केले की सूर्य हा सुध्दा स्थिर नाही. तो सुध्दा गतिमान आहे व ही सर्व सूर्यमाला कोठे तरी जात आहे.

सर्व शोध लोकांच्या विचारात क्रांति घडवून आणणारे

असे होते. विचारसरणी अगदी ठाम. तो डगमगला नाही. आपले काम त्याने सुरु ठेविले. इ.स.१६३२ ''सृष्टिरचने संबंधी संवाद'' हा त्याने आपला ग्रंथ प्रसिध्द केला. त्याच्या सर्व शोधांचे हे परिणाम फक्त होते. सर्व शोधाचा उपयोग करुन त्याने विश्वाच्या रचने संबंधी गहन सिध्दांत यांत मांडिले आहेत.

हा ग्रंथ प्रसिध्द झाल्यावर सरकारने त्याच्यावर ''नास्तिकपणाचा आरोप'' ठेऊन खटला भरला. आपली मते पसरविण्यास त्यास प्रतिबंध करण्यात आला. 'माझी मते, माझे शोध व माझे सिध्दांत खोटे आहेत, भ्रामक आहेत' असे त्यास प्रसिध्द करण्यास भाग पाडले.

परंतु सत्य हे कोंबडी झाकून ठेविली तरी थोडेच उदयास यावयाचे राहील. सत्य दडपून ठेविता येत नाही.

पुढे १६३६ मध्ये हा नामांकित शास्त्रज्ञ अंध झाला. अंध झाला तरी त्याची बुध्दी अंध झाली नव्हती. त्याची बुध्दी पूर्वीप्रमाणेच जोरदार होती. आपल्या शिष्यास सांगून त्याने दुसरे ग्रंथही प्रसिध्द केले.

इ.स.१६४२ मध्ये हा मरण पावला.

प्रख्यात गणितज्ञ, ज्योतिः शास्त्रज्ञ न्यूटन आला. कदाचित आपल्या देशात झालेला छळ पाहून ज्या देशात छळ होणार नाही त्या देशात तर गॅलिलिओ जन्म घेऊन आला नसेल? कोणास ठाऊक ? परंतु मला तर लहानपणी नेहमी वाटे की, न्यूटन म्हणजे पुर्नजन्मात आलेला गॅलिलिओच होय.

❒ ❒ ❒

।। २ ।। दिवाळीची सुटी

आता शाळेस दिपवाळीची सुट्टी होणार. तुम्ही सर्व घरोघरी जाल व दिपवाळीच्या आनंदात गर्क व्हाल. भावांबहिणींजवळ सुखगोष्टी, गप्पाविनोद यात काळ केव्हाच जाईल. आईबापास मुले आली म्हणून फार आनंद होईल. तुमच्या येण्याकडे तुमचे घरची मंडळी डोळे लावून बसली असेल.

सुटीत मजा करा, खेळा, मनाने मोकळे व्हा, शरीराने पुष्ट व धष्ट व्हा. परंतु गु. गोखले यांनी जातांना मला लिहावयास सांगितले आहे. ते मी जे काही लिहिणार आहे ते सर्वांनी ध्यानात धरावे. ``घरी गेले तरी लवकर होता होईतो निजत जा; लवकर उठत जा; काही मंगल दिवस सोडून बाकीचे दिवशी थंड पाण्यानेच स्नान करा, चहा वगैरे घरी रोज घ्यावयास लागू नका '' कारण या छात्रालयात ज्या सवयी तुम्हास लावण्यास प्रयत्न करण्यात येतो, त्या सर्व गोष्टींवर

सुट्टीत गेल्यावर पाणी पडते व तुम्ही छात्रालयात येता ते कोरेच. येथे आल्यावर लवकर उठण्यास जड जाते; चहा नसल्याने कपाळ दुखते.थंडपाण्याची लवकर आंघोळ करवत नाही. रात्री लवकर निजावेसे वाटत नाहीव लवकर उठावयास जिवावर येते आणि मग यासाठी छात्रालय चालकास मग दंड वगैरे उपायांचा अवलंब नाइलाजाने करावा लागतो.

गु.गोखले यांनी येथून जाण्यापूर्वी कांही पालकास पत्रे पाठविलीच आहेत. त्यात त्यांनी लिहिले आहे आपल्या मुलांस घरी वरील नियम पाळण्यास शक्य तो लावावे. त्यास निराळ्या संवयी ज्या छात्रालयाच्या शिस्तीविरुध्द आहेत. त्या लावू नये. कारण तुमचे मुलास येथे परत आल्यावर मग जड जाते.'' पालकास लिहिलेच आहे. पण पालक पुष्कळवेळा मुलांजवळ लडिवाळपणाने वागतात व ते साहजिकच आहे. पुष्कळ वेळा प्रेम हित व पथ्य काय हे पाहू इच्छित नाही. यासाठी वडिल जर काही विरुध्द सांगू लागले. तर मुलांनीच त्यास सांगावे. ''बाबा, आता येथे असे केले तर मला ही सवय लागेल व सुटी संपल्यावर छात्रालयात गेले म्हणजे मग मला ती सवय फार नडते. म्हणून मला आग्रह करु नका'' या बाबतीत छात्रालयातील एक माजी विद्यार्थी कृष्णाजी रामचंद्र परळीकर यांचे उदाहरण लक्ष्यात ठेवण्यासारखे आहे. त्यास चहाची सवय होती. परंतु छात्रालयांत आल्यावर त्याने सांगितले. मग जेव्हा जेव्हा घरी जात असे तेव्हा चहास कधी शिवला नाही. आजारी असतांना सुध्दा चहा हे नाव काढल्याबरोबर तो संतापे. व आजारीपणातही त्याने चहा घेतला नाही. तसेच थंड पाण्याचे स्नान त्याने घरी सुध्दा कधी टाळले नाही व त्यास वडील आग्रह करीत; परंतु छेः त्याच्या भावास ही चहाची सवय सोडवली नाही. तोही छात्रालयात होता; परंतु घरी गेल्यावर दोन वेळा चहापान व्हावयाचे व चोरुन रात्री १२ वाजता चहाचे आधण चढावयाचे.

तर ही दोन्ही उदाहरणे लक्षात आणून पहिल्याचे अनुकरण सर्वांनी करणे अशी माझी गु.गोखले यांच्या वतीने नम्र प्रार्थना आहे व तदनुरुप शक्यतो सर्व वागण्याचा प्रयत्न करतील अशी आशा आहे. सुटी संपल्यावरही सर्वांनी लगेच परतयावे नाही तर सुटी लांबवून घरी राहता व मग शाळेत अभ्यास होत नाही आणि परिक्षेत जड जाते. शाळेचा दिवस एकही चुकू नये. लवकर, आनंदाने, धष्ट पुष्ट असे चांगल्या संवयीचे, छात्रालयांत या.

नगर वाचनालय सातारा.
बाल विभाग

॥ ३ ॥ चांगले केल्याने चांगले होते

– रामदास

मागे छात्रालय दैनिकांत लिहिले होते की, जी मुले दुर्गुण घालविण्याचा प्रयत्न करीत असतील त्यांनी नावे द्यावीत. त्यांचे प्रयत्न जास्त चांगले व ज्यास यश आले असेल त्यास पाच रुपयांचे बक्षिस ठेवण्यांत आले होते. परंतु आज १० दिवस झाले. एकाही मुलाने नाव दिले नाही. यावरुन काय सिध्दांत काढावयाचा? एकतर आमच्या छात्रालयांतील सर्व विद्यार्थी सद्गुणांचे पुतळे आहेत. सुधारणा करावयाची असे त्यांचे जवळ काही नाही. त्यांचे आचरण निष्कलंक आहे, त्यांचा अभ्यास चांगला आहे, ते नियमित, स्वच्छ, टापटीपी आहेत. ते अजात शत्रू आहेत. ते आज्ञाधारक आहेत. परंतु हा सिध्दांत मला काढता येत नाही. माझ्या डोळयासमोर दोषयुक्त मुले दिसत असता त्यास मी चांगली कसे म्हणू? जी मुले गोरीगोमटी नाहीत त्यास मी गोरीगोमटी कसे म्हणावे? तेव्हा दुसरा सिध्दांत म्हणजे कोणीही आपले दुर्गुण घालविण्याचा प्रयत्न केला नाही.

आपल्यामध्ये दुर्गुण आहेत ते दूर करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य नाही का? आजूबाजूची घाण तुम्ही दूर करिता. सदरे कोट धोतरे रोज कधीमधी धुवून स्वच्छ करिता, मग कोटापेक्षा सदरा जो आहे त्यापेक्षा महत्वाचे असे तुमचे मन तुम्ही धुवून टाकण्याचा प्रयत्न नको का करावयास? तुम्हांस स्वत:चे दुर्गूण माहीतच नसतील असे मी समजू इच्छित नाही. प्रत्येकास जर तो जरा मनांत डोकावून पाहिल तर स्वत:चे गुणदोष स्पष्टपणे दिसून येतील.

तिसरा सिध्दात म्हणजे प्रयत्न करीत असूनही मजजवळ नाचे देण्यास विनयाने लाजले. हा तिसरा सिध्दात जर खरोखर सत्य असेल तर मला आनंदच वाटतो. कारण मनाच्या समाधानासारखे सद्गुणाचे दुसरे बक्षीस कोणते थोर आहे?

जगात जर आपणास दिवसेंदिवस उदार, थोर व सज्जन व्हावयाचे असेल, परमेश्वराचे जवळ जाण्याची इच्छा असेल, तर आपण आपणास निर्मळ सच्छील बनविण्याचे फार प्रयत्न केले पाहिजेत. प्रयत्नाशिवाय काय मिळणार? जाणून बुजून, जाणतेपणे नेटाचे प्रयत्ने आपली मनासिक आतरिक सुधारणा करा. डोळयानी नीट पहा, कानांनी चांगले ऐका. वाचेने गोड बोला. मनांत चांगले विचार करा. 'भद्रकर्णेभि: श्रृणुयाम्' ही प्रार्थना रोज आपण करितो, परंतु बोलल्याने मनावर थोडाच परिणाम होणार आहे? 'मना पाप संकल्प सोडोन घ्यावा, मना सत्य संकल्प जीवी धरावा' हा समर्थांचा उपदेश मनास करा व आपले आचरण जास्त शुध्द तर करीत जा. मुलांनो, चांगले केल्याचा प्रयत्न केल्याशिवाय चागले होत नाही इच्छेने चांगले प्राप्त होत नाही. केवळ इच्छा कुचकामाची; प्रयत्न कळकळीचे करा.

• • • • • •

नगर वाचनालय सातारा.
बाल विभाग

॥ ४ ॥ मेघो राजा, वरसरे !

ध्वनान्ति मेघाः स्फुरित तडिद्धिः
प्रचण्ड ना तो भुरालानु धारा

मेघ गडगडत होते, विजा चमकत होत्या; झंझावात सुटून, मुसळासारख्या पर्जन्यधारा पडत होत्या. आकाशरुपी अभिषेक यात्रांतून शतधारांनी भूदेवीवर वर्षाव होत होता. मेघ गात होते. विजांचे नंदादीप लावले होते. कालची रात्र या वर्षीच्या पावसाळयात स्मरणीय आहे. असा कडाक्याचा पाऊस आतापर्यंत येथे पडला नव्हता. पंचमहाभूतांचा प्रचंड खेळ चालला होता. आकाश व भूतल जणू एक झाली होती. मध्येच जेव्हा चमके त्यावेळेस सर्वत्र पाणीच पाणी दिसत होते. रात्रींचा देखावा फारच सुंदर होता.

वारा तर इतका जोराचा आला की वाचनालयातील तसबिरा धडाधड खाली पडल्या व काहींच्या काचाही फुटल्या. जमिनीवर ठेवलेले कंदील वाऱ्याने पाडले जात होते. इतक्या जोराचा पाऊस आला. प्रार्थना मंदिरात सर्वत्र गळू लागले. हरिभाऊंच्या खोलीतील खादी, वाचनालयातील दैनिके,

नगर वाचनालय सातारा
संगणकीकरण

मासिके, पत्रे, चंद्रोदयांची खोली यातील सर्व सामान हलविण्यात आले. छात्रालय दैनिकाचे संपादकांची खोली कर्मधर्म संयोगाने फार गळत नव्हती. यामुळे त्यांची खोली म्हणजे एक कोठीचीच खोली झाली.

सामान वगैरे लावल्यावर गु. जठार व साने यास जरा पावसात नाचण्याची पळण्याची इच्छा झाली. इच्छा प्रबळ झाली व दोघे प्रार्थनाघरांतून तसेच विजांच्या प्रकाशात वर्षावांत गोखल्यांकडे गेले; तेथे बाहेर उभे राहून सृष्टी सौंदर्यांवर चर्चा करुन पुनः मैदांनातून नाचत आपल्या घरी आले. ओले कपडे काढून नवीन घातले. अंगावरुन उबदार अंथरुण पसरुन आता झोपी जावे असे ठरविले.

शेते तर याच्याआधीच झोपी गेली होती. मेघांच्या अंगाई गीतांनी बाजरी जमिनीवर निजली, ही त्यांची नीज आता कधी संपते पहावे. भुईमुगांची शेते काय म्हणणार? बहुत करुन ती रागावणार? कपाशी मात्र प्रसन्न राहील असे वाटते, मी अर्थात शेतकरी नसल्यामुळे माझे हे अंदाज चुकतीलही.

पावसाची लोक उत्सुकतेने वाट पहात होते. 'मेघोराजा वरसरे, वरसरे, मेघोराजा वरसरे' ही प्रार्थना गु.गोखले तर आज रोज म्हणत होते. शेवटी आला एकदाचा पाऊस. फारच जोराचा आला. पावसास आज पर्यंत कधी कोणी बरे म्हटले नाही. येतो तेव्हा तो फार येतो, गेला तर अजिबात जातो, हे मेघराजा, तू जर वेळच्यावेळी प्रमाणात देशील तर तुझी स्तोत्रे आम्ही सदैव गावू. परंतु जर रागाने आक्रोश करशील किंवा दूर काळेतोंड करशील तर तुला शिव्याशापाशिवाय काय मिळणार?

● ● ● ● ● ●

।। ५ ।। पोळा

येषा सहाय्येन सुजीविकांभुवि
करोषि तान्प्रत्युपकर्तुमर्हसि''

ज्यांच्या साहाय्याने या जगात तुम्ही सुखाने जीविका करुं शकता, त्यांचे उपकार फेडणे हे तुमचे पवित्र कर्तव्य आहे.

आपग या जगांत अनेकांचे ऋणी असतो. अनेकांच्या अनंत खटपटींनी आपण उपकृत आहोत. या उपकारांबद्दल मनात स्मृती ठेऊन त्या उपकारकर्ते लोकांचा गौरव करणे हे सर्व सुसंस्कृत वा असंस्कृत लोकांत स्तुत्य व वंद्य मानले जाते. ज्या शूर शिपायांचमुळे राष्ट्रास गौरव, मोठेपणा, मान जगात प्राप्त होतो, त्या शूर शिपायांच्या समाधीवर वर्षात ठराविक दिवशी पुष्पमाळा अर्पण करण्याचा पुष्कळ राष्ट्रांत प्रघात आहे.

परंतु मनुष्य प्राणी हा फक्त मानवांचाच ऋणी आहे असे नाही. आपण सृष्टीचे ऋणी आहो, पशु पक्ष्यांचे ऋणी आहो, त्यांचे ऋण फेडण्याचेही काही दिवस आपण ठरविलेले आहेत. अशा चांगल्या दिवसांपैकींच आजचा पोळा हा दिवस आहे

'पोळा' म्हणजे बैलांची पुजा करण्याचा दिवस .हिंदूस्थान हा कृषिप्रधान, शेतकीचा देश आहे. वेदकाळापासून आपले

देशातील लोक शेतीची पूजा करीत आले आहेत. जुन्या लोकांत एक म्हण आहे. उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ नोकरी आपली संपत्ति पूर्वी गुरांढोरांनी मोजीत असत. जून्या काळी नांगराच्या जोडया ४ विहिरी असे वर्णन करुन एखाद्याच्या श्रीमंतीचे वर्णन करितात.

ऋग्वेदात द्युत खेळून पश्चात्ताप पावलेला एक पुरुष इतर लोकांस उपदेश करितो 'बापहो, मी पहा. कष्टी झालो आहे, मला बायको विचारीत नाही, माझे आईबाप रडत आहेत. तुम्ही माझ्या उदाहरणापासून धडा घ्या. 'कृषिमित कष्पस्व' 'शेतकीच करा' असा तो शेवटी उपदेश करितो.

शेती कोणाच्या जोरावर आपण करितो? बैलांच्या श्रमावर. शेतकरी पहाटे उठतो. उन्हाळयात नांगर हातात धरुन जमीन सर्व नांगरुन ठेवितो. एक पाऊस पडला, पुनः नांगरतो व मग पेरा वगैरे करितो. कोकणात तर बैलांची फारच जरुरी लागते. बैलांच्या मानेवर जू ठेऊन आपण त्यास श्रम करावयास लावतो. आता पेरणी, लावणी संपलेली असते. शेते, हिरवीगार झालेली असतात. वाऱ्याच्या योगाने ही हिरवीगार तरारलेली शेते पाहून शेतकऱ्याचा आनंद गगनात मावत नाही. आपल्या मोत्यास, राजास, सरदारास आसूडाने मारले. सरदारा मुका प्राणी तूं. तू अखंड श्रम केलेस. माझे शेत नांगरलेस, हिरवेगार आज झुलते आहे. बाबारे, तुझा हा उपकार. ये, मोत्या, हि-या ये, रागावू नको, रुसू नको. आज कोंडयाचा मांडा केला आहे. गरिबीचा संसार, पण तुझ्यासाठी पुरण घातले आहे. तू माझा देव आहेस, तू माझा आधार आहेस, खा हे ताट. तुला कृतज्ञतेने वाढले आहे. बैलोबा, खा, पोटभर खा. असाच माझ्या उपयोगी पड. तू माझा सखा; तू माझा सोबती; उन्हातान्हांतील तू माझा वाटेकरी. खा. असा बघू नको; बेटा, तुझ्यासाठी आणले आहे; तुझ्या श्रमाचे

खंडोगणती गल्ले पिकतील; तू खा; मग आम्ही खाऊं'' असे शेतकरी कृतज्ञतेने बैलास म्हणतो. बैलास पोळी दिली. बैलाची पाठ थोपटली; त्याचे कपाळ खाजविले. मग घरात शेतकऱ्यांची मुले बाळे, थोर मोठी माणसे, बायकामंडळी सुखाने जेवण करितात. रात्री गाणी गातात व पोळा संपतो.

ऋग्वेदात एक बैलांचे सुंदर स्तोत्र आहे. ते मॅक्स मूल्लर या पंडितास फार आवडले. हा सण त्यास फार आवडला. मुक्या जनावरांबद्दलची ही कृतज्ञता किती थोर आनंददायी आहे. हा दिवस आहे किती उदात्त ! ज्या प्रमाणे दसऱ्याच्या दिवशी घोडयाच्या गळयांत झेंडूच्या फुलांच्या माळा घालून त्यास अलंकृत करितात. त्याप्रमाणे या पोळयाच्या दिवशी बैलास शृंगारतात. त्यांची शिंगे तांबडया रंगाने रंगवितात. बाशिंगे बांधून गळयांत फुलांचे हार घालतात. त्यांच्या पाठीवर श्रीमंत लोक झुली घालतात. आज बैल हे राजे होत. धनी त्यांचे सेवक. सायंकाळची वेळ झाली की वाद्ये वाजू लागतात; बार उडू लागतात. ते पहा बैल झुलत चालले. मानकऱ्यांच्या मानाप्रमाणे बैलांच्या रांगा चालल्या आहेत. खेडेगावांत या दिवशी गांव कार्यास लोक पैसे देतात व ज्याने जास्त पैसे दिले असतील त्याचे बैल सर्वांच्या पुढे मिरवत सुखाने डुलत चालतात.

नगर वाचनालय सातारा.
बाल विभाग

वाजंत्री, दारुबार, अशा थाटाने वृषभराजांची मिरवणूक निघते. गावात मिरवणूक झाली म्हणजे हा बैल घरी येतो. त्याची पूजा करितात. आज घरांत त्याच्यासाठी पुरणपोळी केलेली असते. आज आधी नैवेद्य कोणास दाखवावयाचा ? शंकराच्या या आवडत्या वाहनास. ज्याच्या मुळे तुम्ही जगणार, त्यास आज आधी नैवेद्य दाखवा. ताटात पान पुरणपोळीचे भरभक्कम वाढतात; वर तुपाची धार ओततात. ये रे, बैलोबा, येरे राजा.

● ● ● ● ● ●

॥ ६ ॥ आ. कृपलानींचा संदेश

गुजराथ विद्यापीठाच्या पदवीदान प्रसंगी आचार्य कृपलानी यांनी जो सुंदर उपदेश केला, त्यांतील एक महत्वाचा भाग दैनिकाच्या वाचकांसाठी देत आहे

``एक गोष्ट विशेष करुन तुमच्या समोर मला स्पष्टपणे मांडावयाची आहे. हिंदूस्थानच्या इतिहासाच्या अध्ययनाने व मी केलेल्या नीट निरीक्षणाने माझी अशी ठाम समजूत झाली आहे की, वैयक्तिक गुणात भारतीय इतर राष्ट्रांपेक्षा केव्हाही कमी नाहीत. व्यक्ति म्हणून आपण कनिष्ठ नाही, तर जे गुण सामुदायिक असतात, त्यात आपण कनिष्ठ आहोत. आपल्याकडे सामाजिक व सामुदायिक गुणांचा फारच अभाव आहे. शीख, गुरखा, पठाण हे व्यक्तिशः इंग्लिश, जर्मन, फ्रेच शिपायापेक्षा काकणभर श्रेष्ठच ठरतील. परंतु व्यक्तींची बनलेली जी पलटण ती मात्र पाश्चात्य पलटणी पेक्षा कमकस ठरते. आपण आपली स्वतःची घरे स्वच्छ ठेवतो; वैयक्तिक व खाजगी आरोग्याकडे आपण दुर्लक्ष करीत नाही. परंतु आपण सर्व शेजारी शेजारी राहू

लागलो म्हणजे घराबाहेर नुसता नरक निर्माण करतो. आपल्या घरांतील केरकचरा शेजाऱ्यांच्या घरासमोर टाकण्यास कोणाच्याही घराच्या भिंतीशी लघवीस बसण्यास आपणास वाईट वाटत नाही. जर पाश्चात्यांबरोबर टक्कर द्यावयाची असेल, जर त्यांच्या बरोबर समानस्थल आपणास प्राप्त करुन घ्यावयाचे असेल, तर आपण आपल्यात सुरु असलेले सामुदायिक व सामाजिक गुण यांचे संवर्धन केले पाहिजे. एकत्र येणे, सहकार्य करणे, विरोध ज्या गोष्टी बद्दल होईल तिकडे दुर्लक्ष करुन, ज्या गोष्टींवर ऐक्य होईल, त्यासच प्राधान्य देणे हे आपणास शिकावयाचे आहे. आपल्या लोकांचा असा स्वभाव आहे की, त्यास वस्तुंचा तरतमभाव कळत नाही. प्रत्येकाचे प्रत्येक मत म्हणजे त्यास तत्त्वच वाटते व त्याच्यासाठी त्या प्रत्येक मतासाठी तो आवेशाने भांडतो. चहा पिऊ नये . या मतास जितके मानतो, तितकेच सत्य हे श्रेष्ठ आहे. चिरंतन टिकणारी, जी शाश्वत आहेत. ज्यामध्ये वादविवाद, मतभेद यास जागाच नाही. अशी तत्त्वे थोडी असतात व असली पाहिजेत. आपणांस तर प्रत्येक मत म्हणजे अविचारणीय तत्त्वच वाटते! त्याचप्रमाणे सामुदायिक संघ जीवन व खाजगी वैयक्तिक जीवन यांतील फरक आपण नीट लक्षात धरला पाहिजे. खाजगी व्यवहारात, ज्याच्या जवळ आपले मतभेद आहेत. अशा गृहस्थाजवळही सार्वजनिक कार्यात आपण सहकार करावयास सदोदित तत्पर राहिले पाहिजे.

● ● ●

॥ ७ ॥ गणपती बाप्पा मोरया !

''सदैव विघ्नेश नमो नमो स्तुते ॥''

हे विघ्नहरण करणाऱ्या गणेशा, सदासर्वदा आमचा नमस्कार तुला असो.

आज भाद्रपद शु॥ चतुर्थीचा दिवस. ज्या दिवशी रात्री चंद्राचे दर्शन घडल्यास चोरीचा आळ येतो असे आपण म्हणतो, समजतो तो हा चतुर्थीचा दिवस. आजचा दिवस मंगलमूर्ती गजानन यांचा जन्मदिवस होय. सर्व लोकांची विघ्ने हरण करण्यासाठी प्रत्यक्ष भगवान विष्णूनी पार्वती मातेच्या उदरी हा अवतार धारण केला.

आजच्या दिवसाचे माहात्म्य फार मोठे आहे. विघ्नहर्ता, विद्या व कला यास आधार असा जो परमेश्वर त्याचा हा दिवस. आपण तर अनेक विघ्नांनी वेढले गेले आहोत. आपणास विद्येचा जवळ जवळ अस्त होत चालला आहे. कलांची हकालपट्टी होत आहे. कलांस उत्तेजन देणारा कलाविद फार मुष्कीलीने आपल्या दृष्टीस पडतो. अशा परिस्थितीत या देवतेचे स्मरण करुन तरी आपणास थोडी फार आशा लाभो.

आम्ही लहानपणी या गणेश देवतेची प्रार्थना करण्यासंबंधी एक श्लोक शिकलो होतो. श्लोक साधा व सरळ आहे. म्हणून मी खाली देतो.

`` प्रारंभी विनंती करू. गणपती विद्यादयासागरा,
अज्ञानत्व हरोनि बुध्दिमति दे आरोग्य मोरेश्वरा,
चिंता क्लेश दारिद्रय,दु:ख अवघे देशांतरा पाठवी.
हेरंबा गणनायका गजमुखा भक्ता बहु तोषवी''

प्रथमत: गणपति हा चौदा विद्या व ६४ कला यांचा साठा आहे. तेव्हा त्यास विनंती करा, हे गजानना, आम्हास विद्या द्या, आमचे गाढ अज्ञान दूर करुन, आमच्या जवळ बुध्दि, मति राहील असे करा. सूज्ञ, प्रज्ञावंत असे आम्ही जगात कर्तबगारी करावयास लायक व्हावे असे करा'' गजानन ही देवता केवळ विद्येचीच नाही. गजानन ही देवता केवळ विद्येचीच नाही. गजानन हा लढवय्या पण आहे. सिंदुरासूरादिकांचा त्याने पराभव केला आहे. सिंदुरासुरास त्याने, सिंहाने हरिण मारावे तसे ठार केले आहे. बुध्दि, विद्या, कला, याप्रमाणे शक्तीने पण ही देवता मंडित आहे. म्हणून भक्त त्या गजाननास म्हणतो बुध्दी, कला, ही तर देय. परंतु या गोष्टींचा आयुष्यात स्वत:ला, राष्ट्राला उपयोग व्हावा यासाठी, गणेश सर्व ठायी आहे. आपणास आरोग्याची आवश्यकता फार आहे. हे देवा आरोग्य द्या.

आरोग्य उत्कृष्ट केव्हा राहील? ज्या वेळी मन प्रसन्न असेल, चिंता, काळजी व्यथा यांनी रंगवले नसेल, त्यावेळी शारीरिक व मानसिक आरोग्य टिकू शकते. चिंता असेल तर मोठा भीम सुध्दा निरुत्साह व हतवीर्य होतो, व उत्साह जोम असेल तर अशक्त चांगली कामगिरी करु शकेल. ``चिंता सम नास्ति शरीर शोषणम्'' चिंते सारखे शरीरास हानिकारक दुसरे काही नाही. चिंता ही जिवंतपणी मनुष्याचे मन व तन जाळणारी चिताच आहे. संस्कृत मध्ये म्हटलेच आहे की, चिंताचिता समानास्ति । बिंदू याच विशेषत: एका बिंदूंचा फक्त फरक आहे.

नगर वाचनालय सातारा

संगणकीकृत

परंतु या बिंदूत सर्व सिंधू साठविलेला आहे. तर अशी जी चराचर चिरणारी सुरी चिंता, त्या चिंतेला हे गणनायका दशदिशांत दूर कोठे तरी पाठवून दे. चिंता मानसिक किंवा कुठलीही !

एकनिष्ठेने सेवा केली तर. परमेश्वर हा भक्तांचा, तो भक्तीने आकर्षिला जातो. तो भवाचा भुकेलेला असतो. गजानना, आम्ही पण तुझे भक्त आहोत, तुझी सेवा करावयास आम्ही तयार आहोत, तर आम्हास हे वरदान विघ्ननाश वर द्या व आमची सर्व प्रकारे उन्नती होवो. हे मंगलम् आमची सर्व अमंगले दूर होवोत. हे विघ्नहरा, आमची सर्व विघ्ने विलीन होवोत. हे भालचंद्रा, ज्ञानाचा सुंदर प्रकाश आम्हांवर पडो. तुझे आम्ही दास आहोत. तुझा मंगल उत्साह आम्ही बाल गोपाळांनी मांडला आहे. मग तू आमच्यावर आनंदाची सौख्याची, विद्येची, वैभववृष्टी करणार नाही का? आमच्याचपासून दूर जाऊ नको. हे मंगल मूर्ती, सदैव आमच्या जवळ रहा, व विद्या, कला, आरोग्य यांचे सुख आम्हास लाभो.

आम्ही सर्व तुझी मुले आहोत. रामाचे राज्यात ज्याप्रमाणे 'चिंतेसि चिंता असे' चिंतेलाच मी कोठे राहावे अशी चिंता उत्पन्न झाली.

तसेच आता पण होवो, अज्ञानास थारा येथे न मिळो कलाहीनास येथे आश्रय न मिळो. आमच्या भारत देशाच्या बागेत कलांचे व विद्यांचे अनेक मळे लावून दे. त्या मळयास कीड वगैरे लावू देऊ नकोस. मंगलमूर्ते, तूला किती सांगू, किती प्रार्थू, प्रार्थना कशी करावी, मागावे काय, ते सुध्दा खरे म्हटले तर आम्हास समजत नाही. जे आम्हास दिले, आमचे कल्याण होईल असे तुला वाटेल, जे कल्याणप्रदते ते आम्हास दे. आम्ही त्याने सुखी राहू.

□ □ □ □ □ □

॥ ८ ॥ माझ्या लहानपणाची गोष्ट

मी मराठी चौथी किंवा पाचवी यत्तेत होतो. १०/११ वर्षाचा जेमतेम असेन. अर्थात त्यावेळ्ेस माझ्या कोकणात माझ्या जन्म ग्रामी मी शिकत होतो. आमच्या वर्गातील मुलांनी सर्वांनी मिळून गणपति उत्सव करण्याचे ठरविले. एकेक आणा वर्गणी घ्यायचे असे ठरविले. गणपतीची मूर्ति वामन गोंधळेकर म्हणून इतर बाबतीत ढ, परंतु कलांच्या बाबतीत तरबेज अशा मुलाने बनवावयाची असे ठरले.

अद्याप गणेशचतुर्थीस १५ दिवस आहेत; तोच आम्ही गणपती करण्यासाठी चिक्कणमाती दूर गावाबाहेर तीन मैलांवर जाऊन आणण्याचे ठरविले. कोकणात पाऊस फार. आठ आठ दिवस सूर्यदर्शन होत नाही. परंतु त्या दिवशी तो रविवार होता. आम्ही माती आणण्यास जाणार, त्या दिवशी ऊन पडले होते. पावसाचे चिन्ह नव्हते. आम्ही घरी काही न सांगता दहा बारा जण निघालो. जेथे नदीकाठी चिक्कणमाती मिळे ते स्थळ तीन मैलांवर होते. आम्हास नदीकाठी घरची मंडळी पाठवणार नाही म्हणून विचारले नाही.

दुपारी दोन वाजले. आम्ही सर्व जण निघालो. छत्र्या वगैरे घेतल्या नाहीत, कारण कोठे जातात असा संशय येईल. झपझप पावले टाकीत नदीकाठी तर आलो. नदीस पाणी फार नव्हते. तरी पाण्यास खळाळी व ओढ फार एकमेकांस धरुन उभे राहून आम्ही बाजूची माती उकरु लागलो. त्या मातीचे गोळे करुन सागाच्या पानावर ठेऊ लागलो. एक जण तर पाण्याच्या ओघाने जाणार होता वाहून; परंतु आम्ही त्यास घट्ट ओढून धरिले; नाही तर सर्व कपडे वगैरे त्याचे ओले झाले असते.

माती जमा झाली. जवळजवळ सायंकाळ होत आली व आकाशात मेघ, काळे प्रचंड मेघ गोळा होऊ लागले. आमच्या पोटात भीतीचा गोळा उठला. जर आता पाऊस कोसळला तर घरची मंडळी छत्र्या कोणाजवळ नाहीत. तेव्हा आम्ही सर्व जण गंभीरपणा धारण करून नदीतीरी उभे राहिलो व श्री गजाननास प्रार्थना केली. हे गजानना आम्ही तुझा उत्सव करणार आहोत; तुझ्यासाठी तगडया तोडीत दूरवर आलो. कोणास कळू नये म्हणून छत्र्या आणल्या नाहीत. तर आता एवढे करा, देवा, आम्ही घरी जाईपर्यंत पाऊस पाडू नका. आम्ही १० नारळ जास्त तुला वाटू.'' देवाची प्रार्थना केली व नंतर स्वप्रयत्नांतही कसूर होऊ नये म्हणून सागाच्या वृक्षाची छत्रीसारखी मोठमोठी पाने असतात, ती तोडून घेतली, न जाणो आलाच पाऊस, तर थोडा आधार. बुडत्याला काडीचा आधार घेण्यासही इच्छा होते.

आम्ही झपझप पावले टाकीत होतो. पोटात बागबुळा होत होते. आकाशाकडे पहावे, पुढे चालावे असे चालले होते. देवा गजानना, पाऊस आता नको आणू बरे'' असे आम्ही तोंडाने विनवीत होतो. शेवटी घरे जवळ आली. दिवेलागले होते.पाऊस आला नाही म्हणूनच आम्हासही आनंद झाला! वामन गोंधळेकरांकडे माती ठेऊन आम्ही आपापल्या घरी गेलो. घरात पोहचलो व थोडयाच वेळात पर्जन्यास सुरुवात झाली.

आमची प्रार्थना गजाननाने ऐकिली असे आम्हास वाटले. आम्ही उत्सव थाटाचा केला. सुंदर मखर घातले होते.

नारळ व खिरापत याचा पाऊस पडला.

सांगावयाचे एवढेच की, निर्मळ श्रध्दा बालपणी परमेश्वरावर असते. सर्व कर्ता, सर्व हर्ता, सर्व देता तो आहे. मन संशयातीत व निष्कपट असते. परंतु आपण मोठे होत गेलो म्हणजे मनात संशय येतात. पाऊस पडला नाही हे देवाचे ऐकणे नसून, काही तरी सृष्टीनियमानुसार पाऊस पडला नाहीच तत्त्वे आपण लावू पहातो. परंतु देवाने प्रार्थना ऐकली व पाऊस पडला नाही, या भावनेत जो आनंद आहे, त्या आनंदास तरी तोड नाही. ही लहानपणाची श्रध्दा, ही भक्ति आपणात यावी असे मोठेपणी वाटते. टेनिसन कवीने असे म्हटले आहे. हा जर्मन कवी एके ठिकाणी असेच म्हणतो ती श्रध्दा ती भक्ती मला का ? नाही असो, तर बालपण हे निष्कपट व सरळ असते.

❑ ❑ ❑ ❑ ❑ ❑

नगर वाचनालय सातारा.
बाल विभाग

।। ९ ।। निळा पक्षी

'निळा पक्षी' या पुस्तकाचा कर्ता मॉटिस मॅटर्लिक. १८६२ मध्ये त्याचा जन्म झाला. तो कधी बेल्जम मध्ये राही, कधी फ्रान्स मध्ये. घेंट येथील विद्यापीठात त्याचे शिक्षण झाले. १८८७ मध्ये तो पॅरिस शहरात येऊन राहिला. तेथील कवींशी त्याचा परिचय झाला. प्रतीकवादी कवींशी त्याचा परिचय अधिकच वाढला, परंतु त्याचा पिता निर्वतल्यामुळे तो पुन्हा बेल्जममध्ये परत आला. १८८९ पासून त्याची साहित्य सेवा सुरु झाली.

मॅटर्लिक याने कीतीतरी लिहिले आहे. तो गूढवादी लेखक आहे. परंतु त्याच्या लिहिण्यात गूढ न राहता प्रकट होत असते. त्याच्या लेखनातील प्रतिकवाद इतका वास्तविक असतो की तो सहज समजतो. त्याची भाषा अत्यंत सोपी आहे. सामान्य जीवनांतील सुंदरता दाखविणे हे मॅटर्लिक याचे ध्येय आहे. नाटके, कविता, निबंध, नाना प्रकारात त्याने लिहिले आहे. त्याला वाङ.मयातील नोबेल प्राईसही मिळाले आहे.

अश्या विख्यात साहित्याचार्याचे ''निळा पक्षी'' हे गोड पुस्तक मी मराठीत आणले आहे. या पुस्तकाचे बहुत भाषांतर नाशिकच्या तुरुंगांत १९३३ मध्ये मी केले होते. काही भाग राहिला होता. तोही पुरा करुन हे पुस्तक आज मराठी वाचकांस

देत आहे.

''निळा पक्षी'' हे नाटक आहे. प्रतिकात्मक नाटक मोठे गोड नाटक आहे. ते कितीदा वाचले तरी मला समाधान होते नसे. नेहमीच्या नाटकाप्रमाणे हे नाही. लहान मुले व परी याचे हे नाटक आहे. या नाटकांत सारी अंतर्बाह्य सृष्टी पात्र रुपाने उभी केली आहे. चराचर सृष्टी येथे बोलते. रागान हसते, रडते, मानव प्राणी व इतर सारी सृष्टी यांचा झगडा येथे दाखविला आहे. स्थूल व क्षुद्र अशी सुखे दाखविली आहेत. तर उच्च व उदात्त असे आनंदही उभे केले आहेत. मोठी मौज आहे.

गोष्टीला आरंभ असा आहे की दोन भावंडे रात्री एकदा जागी होतात. समोरच्या श्रीमंत घरी खाणे पिणे गाणे चालले असते, तेथे मुले आनंदात असतात. कारण सणाचे ते दिवस असतात. परंतु या भावंडांजवळ काय असते? गरीब आईबापांची ती मुले होती. बहीण व भाऊ एका स्टुलावर बसून समोरच्या घरांतील देखावा पहातात. तेथे कितीतरी खाण्याच्या वस्तु असतात. पेढे, करंज्या, सांजोऱ्या असतात. बहिण मालती भाऊ मधू याला म्हणते ''ती मुले खात का नाही ते पदार्थ'' भाऊ उत्तर देतो ''त्यांना भूक नसेल.''

जगात कोणाला कधी भूक नसेल या गोष्टीवर त्या मुलीचा विश्वास बसत नाही. तिला तर नेहमी भूक लागते. त्यांचे पोटही नीट भरत नसेल. भावाचे उत्तर ऐकून बहिणीला आश्चर्य वाटते. त्या एका वाक्यात मॅटर्लिकने समाजातील विषमता मांडली आहे. एकीकडे अपरंपार धन धान्याच्या राशी आहेत. तेथे अजीर्ण आहे. त्या धनधान्याचे काय करावे हे त्या श्रीमंतांना समजत नाही आणि दुसरीकडे उपासमार आहे. सर्व गोष्टींची वाण आहे.

मधु व मालती समोर बघत असतात. शेवटी समोरची मुले खाऊ लागतात. मधु व मालती काय खाणार? परंतु ती गरीब मुले आपली गरीबी कल्पनेने विसरु पाहतात. मालती खोटे खोटे म्हणते '' मी पाच लाडू खाल्ले'' मधु म्हणतो ''मी

दहा अनरसे खाल्ले'' त्यांच्या त्या काल्पनिक खाण्याने हृदय पिळवटते. वाचकाच्या मनात शेकडो भावना व विचार येतात. सारी विषम समाजरचना डोळ्यासमोर येऊन कधी ही नष्ट होईल असे वाटते.

इतक्यांत दारावर टकटक आवाज येतो. मुले चपापतात. कोणी नाही असे वाटते. परंतु तेथे एक परी येथे. ती दिसते कुरुप. परंतु तिला कुरुप म्हटले तर राग येतो. ती त्या मुलांना म्हणते ``तुम्हा माणसांना नीट दिसतच नाही. मी का कुरुप आहे? हे पहा माझे सोनेरी लांब केस, सुंदर डोळे''! वास्तविक तिचे केस ओंगळ व बुटके असतात. डोळे कसे तरी असतात. परंतु त्या परीच्या शब्दांत खोल अर्थ आहे. मनुष्य बहिदृर्ष्टि आहे. तो वरचे स्वरुप पाहतो व परीक्षा करतो. परंतु वस्तूचे अंतरंग पाहणे जगात दुर्मिळ आहे. या जगात भिकारड्या झोपडीत श्रीमंत हृदयाची माणसे सापडतात आणि मोठ्या टोलेजंग राजवाड्यात संकुचित अनुदार व क्षुद्र विचारांची माणसे सापडतात. या जगात फाटक्या कपड्यांना मोलाची थोर जीवने आढळतात, परंतु भरजरी पोषाखात भिकार जीवने दिसतात. ढग काळे काळे दिसतात. परंतु त्यातून सृष्टीला नवजीवन देण्याच्या निर्मळ पाण्याच्या धारा गळतात; आणि क्षुद्र दिसणारे शरद ऋतुतील ढग, ते उगीच गर्जना करणार! या जगात एकूण दिसते तसे नसते तर. मॅटर्लिक याने ही गोष्ट या गोड नाटकात अनेक ठिकाणी दाखविली आहे.

ती परी त्या मुलांना म्हणते `` तुम्ही निळा पक्षी शोधून आणा.'' ती लहान मुले कोठे जाणार? कोण वाटाड्या, कोण बरोबर? तरी परी एक खरा मार्गदर्शक त्यांना देते. कोण बरे झाला मार्गदर्शक? प्रकाश. प्रकाश देवता मार्गदर्शक होते. प्रकाशाशिवाय कोण मार्ग दाखविणार? उपनिषदांतील ऋषींनी ``तमसो मा ज्योतिर्गमय'' अशी प्रार्थना केली. जर्मनीचा महान कवी गटे मरताना म्हणाला `` आणखी प्रकाश मनुष्याने ज्ञानाच्या, विचाराच्या प्रकाशात पावले टाकीतच जीवन यात्रा

चालविली पाहिजे. प्रकाशाच्या संगतीतच या विराट संसाराला रमणीयता देण्यासाठी झटले पाहिजे.

एकटा प्रकाशच का त्या मुलाबरोबर होता? नाही ती परी त्या मुला जवळ एका हिरा देते. ती त्यांना सांगते, `` फिरवा हिरा अमूक बाजूस '' तसे करताच त्या खोलीतील सर्व वस्तूतून आत्मे प्रकट होतात. मॅटर्लिक हा अद्वैत सिध्दान्त सांगत आहे. सर्वत्र चैतन्य आहे हे का तो सांगत आहे? सर्व चराचर, वस्तूंत जीव आहे का सांगतो? खोलीतील सर्व वस्तूतून आत्मे बाहेर पडून बोलू लागतात. एकमेकाशी भांडू लागतात. पुन्हा हिरा दुसऱ्या बाजूला फिरताच आत्मे परत वस्तूंत शिरु लागतात. परंतु काहींना पटकन शिरता येत नाही. कुत्रा, मांजर, साखर, भाकर, पाणी वगैरेना एकदम शिरता येत नाही. मग ही मंडळीही त्या मुलाबरोबर निघते. मुलाबरोबर साखर नको का ! भाकर नको का! मुलांना खाऊ तर आधी हवा. त्या त्या वस्तुंचे व प्राण्यांचे ते ते आत्मे सजतात व या मुलांबरोबर निघतात.

परी कोठे कोठे जायचे ते सुचविते. त्या मुलांना ती सांगते की, ``तुमची मेलेली मंडळीही तुम्हाला भेटतील. आजी व मृत भांवडेही भेटतील. तेथे पहा निळा पक्षी सापडला तर. सारे धुंडाळा'' त्या मुलांना आनंद होतो. प्रथम ती मृतांच्या राज्यात जातात. कबरस्थानांतून जातात. तेथे या दोन मुलांचे फारच बहारीचे संवाद. मरणाबद्दल मुलांच्या काय काय कल्पना असतात त्या सहजपणे मांडल्या आहेत. मालती विचारते ``मेलेल्या माणसांना मुले बाळे नसतात का? `` मधु म्हणतो ``मेलेली मुले ती मेलेल्या माणसांची मुले'' किती साधे उत्तर!

कबरस्थानानंतर स्मृतीच्या प्रान्ताची सीमा लागते. ते शिरतात त्या प्रान्तात. तेथे त्यांना आजोबा, आजी, मेलेली लहान भांवडे सारी भेटतात. मरतांना ज्या वयाची असतात, त्याच वयाची ती सारी दिसतात. ते मृत आजोबा मधु मालतीस म्हणतात. ``आम्ही आता अधिक म्हातारे होण्याचे बंद केले आहे. मरतांना जेवढे होतो तेवढेच आहोत.'' मरतांना कोणी रांगणारी किंवा चालणारी जशी होती तशी दिसतात.

आजोबा व आजी सांगतात '' आमची आठवण तुम्ही काढलीत की लगेच आम्ही जागी होतो. तो पर्यंत झोपून असतो. आमची नेहमी आठवण करीत जा. वर्षातून दोन चार वेळा तरी करा'' मॅटर्लिक सांगत आहे की, जोपर्यंत माणसाची आठवण आपणास येते तोपर्यंत तो अमरच आहे. मृत्युवर स्मरणाने विजय मिळवता येतो. मनुष्य जिवंत असूनही त्याची जर आपणास आठवणही होत नसेल तर आपणापुरता तरी तो मेल्या सारखाच. याच्या उलट मृतांचे सारखे स्मरण होत असेल तर ती मृत माणसे आपणा जवळ आहेतच. सुंदर व थोर कल्पना.

आजी, आजोबा, व मधु-मालती यांच्या या प्रसंगात मोठे मार्मिक संवाद आहेत. उत्कृष्ट स्वभाव चित्रे आहेत. मधु खाण्यासाठी कसा अधीर असतो. भाजी अंगावर सांडून भाजून घेतो वगैरे लहान मुलांचा अधीर स्वभाव दाखविला आहे. आजोबा व आजींना नातवंडे उंच झालेली पाहून कसा आनंद होतो, विशेषत: आजीला मालतीचे कसे कौतूक वाटते ते सारे सह्रदयतेने रंगविले आहे.

नंतर एक भीषण देखावा आहे. निळा पक्षी शोधित मुले जातात. मधु तो हिरा त्या एका विवक्षित बाजूला फिरवतो. सारी झाडेमाडे, सारे पशुपक्षी एकदम बंड करुन उठतात. सर्वातील जीव बाहेर पडतात. मनोरा साठविलेले विचार बाहेर पडतात. मानवेतर सृष्टिला मानवाविषयी काय वाटत असेल ते येथे दाखविले आहे. सारी मानवेतर सृष्टि मनुष्याला खाऊ की चावू असे करते. झाडे म्हणतात'' हा मनुष्य प्राणी आम्हाला तोडतो, जाळतो, कापतो, दुष्ट आहे हा मनुष्य'' बकरे व मेंढे म्हणतात. ''हा मनुष्य प्राणी सारखा आम्हाला मारतो व खातो दुष्ट आहे हा.'' माणसाला निळापक्षी नाही मिळाला काय, हा मनुष्य प्राणी सर्व सृष्टीचा स्वामी होऊन बसत आहे. सृष्टींची सर्व रहस्ये जाणू इच्छित आहे. तो निळा पक्षी त्याला मिळाला तर सारी रहस्ये त्याला कळतील. सर्व

सृष्टीवर तो सत्ता गाजवील. प्रेमाची सत्ता नाही तर सोटयाची सत्ता.

नगर वाचनालय सातारा
बाल विभाग

``सर्व भक्षस्तु वायसः'' असे आपण म्हणतो. परंतु ``सर्व भक्षस्तु मानवः'' असे म्हटले तर किती यथार्थ होईल! आपण स्वतःला मानवेतर सृष्टीच्या अंतरंगी दवडू या. म्हणजे मानवाबद्दल त्या सृष्टीच्या काय कल्पना असतील ते कळेल. आपण पक्ष्यांची शिकार करतो, पशु मारतो, मासे खातो आपल्या पायाखाली लाखो किडे, मुंग्या चुरडल्या जातात आपले किती अपराध मानवाने केवढा कत्तलखाना उघडला आहे! मांनवेतर सृष्टीविषयी मानवाला आहे का प्रेम? आहे का आस्था? मानवाला विजयाची हाव आहे. मानवे तर सृष्टीचा तो सम्राट होऊ इच्छितो. आपल्या इच्छे पुढे सर्व चराचर नमवू इच्छितो. सर्व मानवेतर सृष्टीला तो स्वतःची दासी करु इच्छितो. मानवेतर सजीव निर्जीव सृष्टी आपले स्वातंत्र्य नष्ट होत आहे म्हणून कशी मनात जळत असेल त्याचे येथे चित्र आहे. मधु व मालती हे जणू मानव जातीचे दोन प्रतिनीधी. त्याच्या विरुध्द झाडे माडे पशु पक्षी बंड करतात. त्यांना मारु पहातात. परंतु आयत्यावेळी प्रकाश राणी येते. हिरा दुसऱ्या बाजूस फिरवण्यात येतो.

याच्यापुढे सुखांचे प्रवेश आहेत. विषय भोगांची सुखे प्रथम दाखविली आहेत. पंच विषयांची सुखे, खाना, पीना, सुखसे साना या प्रकारची सुखे. ही सारी सुखे साकार केली आहेत. सारी सुखे येथे बनतात. ऐष आरामाचे सुख, सारखे खाण्याचे सुख. लोळण्याचे सुख, झोपण्याचे सुख. त्यांची मेजवानी चालली आहे. प्रकाशराणी मुलांना सांगते. ``खाऊ नका. तेथे काही, खाल तर कर्तव्य विसराल'' थोर वाक्य. जो केवळ खाण्यापिण्याच्या आनंदात दंग झाला, त्याला कोठले उदात्त आनंद! खाणे पिणे हे एक साधन आहे. खाणे पिणे हे काही जीवनाचे ध्येय नाही. जगून पुरुषार्थ करावा जग आहे.त्यापेक्षा सुंदर व खरे सुखी करावे यासाठी खावयाचे. ती

नगर वाचनालय सातारा

संगणकीकृत

खाण्यापिण्याची गल्लेलट्ठ सुखे मधु मालतीस बोलावतात. मधु मालती निरनिराळ्या सुखांची माहिती मिळवतात. एक सुख जरा थोडेसे विवस्त्र वा अलसतुलित दिसते. मुले विचारतात. या सुखांचे नाव काय? त्यांना सांगण्यात येते. या सुखाशी सध्या नको परिचय. तुम्ही लहान आहात'' मॅटर्लिक सूचक आहे. सूचकतेने सारे समजावून देतो.

ही सारी सुखे जवळच्या दु:खाच्या दरीत शेवटी जायची आहेत असे दाखविले आहे. या सुखांच्या शेजारीच दु:खाचे घर आहे. फार खाणारा शेवटी आजारी पडणार! रोग येणार! आळशी शेवटी भुके कंगाल होणार, अति विषयी सर्वदा दैन्यवाणा होणार! ही विषय सुखे शेवटी जीवनाची माती करतात. आरंभी गोड परंतु शेवटी विषोमय अशी

ही सुखे असतात.

विषयांचे सुख द्वाड
येथे वाटे बहु गोड
पुढे आहे अवघड
यमयातना।। सीताराम राजाराम भजरे मना।।

हेच मॅटर्लिकही सांगत आहे

या क्षुद्र सुखानंतर निर्मळ, पवित्र व उच्च आनंद प्रकट होतात. फारच सहृदय व उदात्त आहे हा देखावा. कृतज्ञता, ज्ञान, उच्चक्षेत्र, पावित्र्य, अकपटपणा, वगैरेंचे आनंद येथे भेटायला येतात. जीवनातील साधी साधी गोड सुखे येथे भेटतात. आपण सभोवती पाहू तर किती तरी आनंद आहेत. पाही ना तो भिकारी. गवतावर सुंदर दवबिंदू पडतात. ते मोत्यासारखे दिसतात. ते पाहून दृष्टी सुखावते. सूर्योदय व सूर्यास्ताचे मनोहर श्यामरंगी देखावे. नद्या, झरे यांचे संगीत, गोड फुले, स्वच्छ हवेचा व स्वच्छ प्रकाशाचा आनंद आई बापांच्या व बहीण भावांच्या प्रेमाचा आनंद, गोड बोलण्याचा आनंद, शेकडो आनंद देवाने दिले आहेत. निळे निळे अनंत आकाश, ते तारे, ते शीतल सुगंधी वारे, झिमझिम पाऊस निळे निळे डोंगर, हिरवी हिरवी राने, किती आनंद!

मनुष्याने जीवनाला कंटाळू नये. संसारात दु:खे आहेत. परंतु त्याचा विसर पडावा म्हणून ईश्वराने अनंत आनंद सभोवती विखरुन ठेवले आहेत. महान कवि रविंद्रनाथ नेहमी म्हणतात. ``सृष्टीतील अपार आनंद मी भरपूर लुटला. सृष्टी आनंदमय आहे.''

मॅटर्लिकने हा प्रवेश अति कोमलतेने रंगविला आहे. ज्या वेळेस मातृप्रेमाचा आनंद भेटावयाला येतो. तेव्हा मधु मालतीची मने उंचबळतात. ती मुले म्हणतात. ``आई, तू इतकी चांगली नसस दिसत. आता कीती छान दिसते. मुलांना स्वत:ची माता कधी कुरुप कां वाटते? आईला शेवडी मुले ही गोड वाटतात.

``स्वतोक पितरा रुचे जरिही कर्दमी रांगले.''

मुलाच्या अंगाची माती आईच्या अंगाला लागली तर आईला धन्यता वाटते. डोळयांत प्रेम ओता व मृग सृष्टीकडे पहा. सारी सृष्टी मंगल दिसेल. जशी दृष्टी तशी सृष्टी.

या प्रवेशानंतर निळा पक्षी शोधावयाला एका अज्ञात प्रदेशात ती मुले जातात. तो भविष्याचा प्रदेश असतो. येथे तर फारच गंमत आहे. भविष्य काळात जन्मास येणारी कोटयावधी मुले येथे असतात. निरनिराळया कोठडयांतून पुढे जन्मास येणारी मुले साठवून ठेवलेली आहेत. निरनिराळी मुले काळ पुरुष रोज पृथ्वीवर ठराविक मुले जन्मण्यासाठी पाठवित असतो. रोज उष:काळ होताच हातात नोंदणी पुस्तक घेऊन म्हातारा काळ पुरुष उभा राहतो. त्या त्या मुलांना तो हाक मारतो. येथे सारे ठरलेले असते. उद्या कोणी जन्मावयाचे परवा कोणी, सारे ठरलेले. कुरकूर करता येत नाही. कोणाला जायची इच्छा नसते तर कोणी त्यांची पाळी नसताही खाली पृथ्वीवर जाण्यास अधीर होतात. प्रत्येक जन्मणाऱ्या मुलाने बरोबर काही तरी नेले पाहिजे. पृथ्वीवर रिकाम्या हाताने कोणी जायचे नाही.

व्यक्तिवादाची मॅटलिकने येथे थट्टा केली आहे की, खरोखरच गंभीरपणे तो व्यक्तीवाद मानतो ते समजायला

कठीण आहे. युरोपात व्यक्तीवादाची एकोणीसाव्या शतकात चलती होती. प्रत्येक जीव काही विशिष्ट गुणधर्म बरोबर घेऊन येतो. प्रत्येकाचा स्वधर्म वेगळा. प्रत्येकाच्या जीवनाचे निरनिराळे रंग, कोणी डॉक्टर होईल, कोणी शेतकरी होईल.कोणी शास्त्रज्ञ कोणी शिक्षक,पिंडे पिंडे मतर्भिन्ना असे आपण म्हणतो.

मधु व मालती तो देखावा पाहाता एक मुलगा म्हणतो मी टमाटो भोपळ्या एवढा कसा करता येईल याचा शोध बरोबर घेवुन जात आहे.दुसरा म्हणतो मी एकाच झाडाला निरनिराळी फळे आणण्याचा प्रयोग बरोबर नेत आहे. प्रत्येक जण काही तरी सांगतो. जो कोणी आपल्याबरोबर काही घेणार नाही त्याला काळ पुरूष दरडावतो.

मागणी तसा पुरवठा हे तत्त्व काळ पुरुष अमलात आणतो. पृथ्वीवर ज्या माणसाची जरुरी असेल ती पाठविण्यात येतात. काळ पुरुष म्हणतो गुराखी थोडेच पाहिजेत. उद्योगधंदे वाढत आहेत शेती कमी होत आहे मग गुराखी फार कशाला ? मॅटलिकने एक भेदक वाक्य मध्येच घातले आहे. काळ पुरुष म्हणतो पृथ्वीवर प्रामाणीक मनुष्याचा एक नमुना मागण्यात आला आहे. एक येऊ दे पुढे प्रामाणीक मानवी संस्कृतीवर केवढी ही टीका! युरोपीय संस्कृतीवर केवढा हा प्रहार. युरोपीय संस्कृती जगाचा व स्वत:चा संहार करीत आहे. जगावर साम्राज्ये स्थापीत आहे. दुसऱ्यास मृतवत करुन स्वत:चे राजवाडे उठवीत आहेत. सर्वत्र लुटालूट व मारामार. सत्ता व अहंकार. सत्याला व प्रेमाला स्थान नाही. प्रामाणिकपणा नष्ट झाला. पृथ्वीवर प्रामाणिकपणा नावालाही राहीला नाही का?

इतक्यात मधु व मालतीस एक मुलगा भेटतो. तो म्हणतो `` मी तुमच्या घरी जन्मणार आहे. तुमचा भाऊ होणार आहे. कसे आहे तुमचे घर? खायला आहे ना पोटभर? मधु व मालती म्हणतात `` आमचे घर काही अगदी वाईट नाही.

परंतु तू बरोबर काय आणणार आहेस? तो मुलगा म्हणतो `` मी देवी, गोंवर, वगैरे घेऊन येईन. त्यातच मरेन.'' मधु व मालती म्हणतात. `` मग जन्मतोस तरी कशाला? '' तो मुलगा म्हणतो ` येथे स्वत:ची इच्छा नसते.''

स्वत:ची इच्छा नसते म्हणजे? सारे का ठरलेले आहे? आपण का कळसूत्री बाहुली? आपणास काही स्वातंत्र्य आहे. की नाही आपणास ज्याची आवड असेल ते आपण करु या. परंतु काहीच करणार नाही. जन्मणार नाही असे म्हणून चालणार नाही. तुम्हाला जन्मावे लागेल. कर्मे करावी लागतील. फक्त कोणते काम करावयाचे ते तुम्ही पसंत करा असा का याचा अर्थ ?''

एक प्रेमी जोडपे असते. प्रियकराला खाली पाठवावयाचे असते. तो आधी जन्मणार. त्याला वाईट वाटते. प्रियकरीण जन्मली म्हणजे ती कशी ओळखणार आपणाला? ती दोघे पृथ्वीवर कशी भेटणार? त्यांना चिंता वाटते. ती एकमेकांस सोडीत नाहीत. शेवटी काळ पुरुष दरडावतो. स्फुंदत स्फुंदत तो प्रियकर नावेत उतरतो.

सारी तयारी होते. पुन्हा यादी वाचण्यात येते.वर रहाणारी मुले खाली जाणाऱ्यास म्हणतात. `` पृथ्वीवर कसे काय आहे ते कळवा. दुरुन गोड आवाज येतात. मधु व मालती विचारतात.

`` हे कसले आवाज त्यांना उत्तर मिळते. `` मुलांची प्रतिक्षा करणाऱ्या प्रेमळ मातांची ती गाणी. येणाऱ्या बाळांचे स्वागत करणाऱ्या मातांची ती मंगल गीते आहेत.मधु व मालती पुन्हा आपल्या घराजवळ येतात. आकाशराणी त्यांना त्यांचे ते घर दाखविते. मुले पुन्हा आपआपल्या छोटया पलंगडीवर . त्यांना झोप लागते. किती तरी उजाडले तरी मुले जागी होत नाहीत. त्यांची आई त्यांना उठवायला येते. ती म्हणतात `` किती छान दिसते घर ! किती सुंदर रंग ! आई तू किती छान दिसतेस आज ! आम्ही आजोबा आजी पाहिली धाकटी मेलेली भांवडे

पाहिली. मजा, आणि ते निळे पक्षी आणि ती निळी मुले आणि ते पशु व पक्षी व ती झाडे कशी अंगावर आली ! त्या आईला हे बोलणे समजत नाही तिची ही दोनच मुले वाचलेली असतात. तिला भीती वाटते. तिला वाटते की ही मुलेही मरणार की काय? ती नक्याला एकदम हाक मारते. तो म्हणतो '' दोन तडाखे देतो म्हणजे जाईल यांचे वेड''

इतक्यात ती शेजारची म्हातारी येते. तिची मुलगी अंथरुणाला खिळलेली असते. मधु जवळ एक पक्षी असतो. तो तिला पाहिजे असतो. त्याच्या ध्यासाने ती आजारी पडते. आपल्या मुलीसाठी तो पक्षी मागावयास ती म्हातारी उजाडत येते. सणाचा मंगल दिवस परंतु मधू मालतीची आई शेजारी बाईस म्हणते आज मुले काही तरी बोलत आहेत. काय झाले कळत नाही कोणाची पडली दृष्ट? कसली झाली बाधा? ती अनुभवी म्हातारी शेजारीबाई म्हणते '' बाधा नाही. काही नाही. स्वप्न असेल. चांदण्यात झोपले किंवा चांदणे अंगावर पडले तर असे होते. थोड्या वेळाने सारे ठीक होईल.''

मधूची आई त्याला म्हणते '' मधू तुझा पक्षी दे ना त्या मुलीला. ती बरी होईल'' मधु एकदम उठतो. तो आपला पिंजरा घेऊन येतो. तो आश्चर्याने म्हणतो. निळा पक्षी तर येथेच आहे. आपण उगीच धुंडीत होतो. ती परी म्हणाली '' म्हाताऱ्या आईच्या मुलीसाठी आणा निळा पक्षी शोधून घरातच पक्षी. शेजारीबाई हा घ्या पक्षी. घ्या तुमच्या मुलीला.

शेजारीणबाईचे हृदय कृतज्ञतेने ओथंबून येते. ती विचारते. '' खरंच का दिलास? फुकट दिलास? कांही किंमत नको? '' मधु म्हणतो ''खरंच दिला. ती म्हातारी आनंदाने घरी जाते. तो पक्षी पाहून ती आजारी मुलगी एकदम उठते. तिचा आजार जातो. तो पक्षी हातात घेऊन ती धावत निघते. तिला एकदम उत्साह येतो. शक्ती येते. म्हाताऱ्या आईला तिच्या बरोबर जाताजाता दम लागतो. माय लेकरे मधूकडे येतात. मधु त्या मुलीला विचारतो. '' त्याला खायला

घातले काय!'' नसशील घातलेस '' मुलगी म्हणते घालीन.'' मधु म्हणतो '' इकडे दे तो. त्याला कसे खावयास घालावे ते दाखवितो. मधू पक्षी ओढू लागतो. ती मुलगी सांशक होते. ती देत नाही त्या ओढाताणीत शेवटी तो पक्षी उडून जातो. निळा पक्षी उडून जातो. ती मुलगी रडू लागते. मधू तिची समजूत घालतो व म्हणतो '' रडू नको. आपण पुन्हा पकडू आपणास पुढे त्याची जरुर पडेल. प्रेक्षकांनो, आमचा निळा पक्षी तुम्हां कोणाला सापडला तर द्या हो आणून.''

संपले नाटक, निळा पक्षी म्हणजे का सुख? सुखाचा शोध करु तसतसे ते दूरच आहे. म्हटले तर ते जवळ आहे. म्हटले तर लांब आहे. सुख हे शेवटी अंतरंगात आहे. सुख क्षणभर सापडल्यासारखे वाटते. परंतु लगेच नष्ट होते. सुख म्हणजे

प्रकाश व छाया. खरे सुख शेवटी चित्ताच्या साम्याव्यस्थेत आहे. '' यद्यत्परवशं दु:खं/यद्य दात्मवशं सुखम् '' ही भगवान मनूंची व्याख्याच शेवटी खरी आहे. सुखाचा झरा शेवटी आपल्या ह्रदयात आहे असे का मॅटर्लिंकला सुचवावयाचे आहे? कां नेहमी मानवजातीने आणखी पुढे आणखी पुढे जात रहाव असे तो सुचवतो?

असे हे गोड प्रतिकात्मक नाटक आहे. मधू जवळ शेजारची मुलगी त्याचा निळा पक्षी मागते. त्याच गोष्टी जणू त्याला स्वप्नांत दिसतात. त्या स्वप्नांत लेखकाने आणखी मनोहर प्रसंग मानवी समाज व संस्कृती यावर प्रकाश पाडणारे योजले आहेत. सोपी भाषा, सह्रदय, व मार्मिक प्रसंग मोठे मधूर आहे हे पुस्तक. मला ते अत्यंत आवडते. माझा हा अनुवाद मराठी वाचक गोड करुन घेवोत अशी त्यांना प्रार्थना आहे.

सर्वांचा नम्र

पांडुरंग सदाशिव साने

('निळा पक्षी' या पुस्तकाची प्रस्तावना)

॥ आमची नवी प्रकाशने ॥

- **वाघिणीचे दूध** / प्रा. मा. य. वैद्य / रु. १५०
- **प्रेरणास्रोत** / डॉ. वि. भि. कोलते / रु. ६०
- **साथी सांगाती** / यदुनाथ थत्ते / रु. ५०
- **विशाखा : अर्घ्यदान** / संपा. डॉ. उषा देशमुख / रु. २००
- **घन:श्याम नयनी आला** / राघवेन्द्रराव पगडी / रु. ६०
- **सहज कशि खेळविते** / बाळ शुक्ल / रु. ४०
- **कोरलेले क्षण** / डॉ. मोहन माजगावकर / रु. ४०
- **साहित्य : आस्वाद आणि समीक्षा** / प्रा. डॉ. रमेश वरखेडे / रु. ६०
- **धुळीतले ध्रुव** / जगदीश देवपूरकर / रु. ३०
- **चंद्रोदय** / साने गुरुजी / रु. ३५
- **देवाघरच्या फुलांनो** / साने गुरुजी / रु. ३०
- **अक्षरांचे घरी (दु. आ.)** / वा. रा. सोनार / रु. ६०
- **मातीचे चेहरे** / डी. एस्. कुलकर्णी / रु. ५०
- **तयांचे काळावरती ठसे** / यदुनाथ थत्ते / रु. ३०
- **गुरुदेवांची गीतांजली** / डॉ. ग. ना. जोशी / रु. १२५
- **स्वरमयी (दु. आ.)** / डॉ. प्रभा अत्रे / रु. १२०
- **यति – यदुनाथ** / संपा. वा. रा. सोनार / रु. २००
- **कुसुमाग्रज साहित्य सूची** / सुभद्रा चौधरी / रु. ३०
- **कुसुमाग्रज गौरव ग्रंथ** / संपादित / रु. २००
- **'तृषार्त' नंतरची कविता** / गणेश चौधरी / रु. ४०
- **प्रिय मुली** / दादा धर्माधिकारी / रु. ३५
- **चरण-स्पर्श** / वा. रा. सोनार / रु. ४०
- **छात्रालय** / साने गुरुजी / रु. ३५

- **चैतन्याची पाने** / प्रा. डॉ. कृष्णा पोतदार / रु. ५०
- **वसा संजीवक चाकांचा** / संपा. बाळ देशपांडे / रु. १५०
- **विचार – सुविचार** / सुधाकर काळे / रु. ५०
- **जॉन आणि अंजिरी पक्षी** / भारत सासणे / रु. ६०
- **मरणकळा** / द. शि. सवाखंडे / रु. ४०
- **वडील पुरुष** / संपा. यदुनाथ थत्ते / रु. ६०
- **सरप्लस शहाणे सर** / रमेश कोटस्थाने / रु. ६०
- **धुळवड** / विजय बहेकर / रु. ३०
- **यमक** / प्रल्हाद जाधव / रु. ३०
- **भूमिका** / प्रल्हाद जाधव / रु. ३०
- **धुयमाती** / मिर्झा रफी अ. बेग / रु. ३५
- **ढगांचे विज्ञान** / प्रा. व. पां. नेने / रु. ३०
- **तहान** / इतबारखा पठाण / रु. २५
- **प्रबोधन उद्यासाठी** / संपादित / रु. १००
- **ध्रुवपद** / प्रा. सु. श्री. पांढरीपांडे / रु. ८०
- **उमाळा** / साने गुरुजी / रु. २५
- **आभाळ–सावल्या** / बाळ दातार / रु. ४०
- **खुराडा** / सुनील मायी / रु. ४०
- **चंदनदाह** / ज्ञानेश सोनार / रु. ६०

चेतश्री प्रकाशन

'मुक्ताई', धुळे रोड, अमळनेर ४२५४०१.

दूरध्वनी : (०२५८७) २२४१९

॥ आमची आगामी प्रकाशने ॥

- वा. गो. आपटे यांची 'आनंदयात्रा' / प्रा. डॉ. श. रा. राणे
- रूपरेषा / वि. वा. शिरवाडकर
- नटसम्राट समीक्षा (दु. आ.) / संपा. गो. तु. पाटील.
- तुकयादारी / वा. रा. सोनार, प्रस्तावना : डॉ. उषा देशमुख
- शोध शेक्स्पियरचा / वि. वा. शिरवाडकर
- सुवर्ण-कोश / संपा. वि. वा. शिरवाडकर
- येरे धना / वा. रा. सोनार
- राघो भरारी / राघवेंद्रराव पगडी
- आकाशाच्या सावल्या / सुरेंद्र बारलिंगे
- दुबळी माणसे / वा. रा. सोनार
- मरुद्गान / वा. रा. सोनार
- कथात्म तुकाराम : एक अभ्यास / प्रा. अनुराधा पोतदार (धुळे)
- प्रतिसाद (दु. आ.) / वि. वा. शिरवाडकर
- गर्जा जयजयकार : एक जागरण (दु. आ.) / संपा. उषा देशमुख
- बुडत्याचा पाय खोलात / वा. रा. सोनार

■ ■

छात्रालय - साने गुरुजी
नगर वाचनालय सातारा
बाल विभाग
पु 33 62628 5978 कि २०/-

चैतश्री प्रकाशन
'मुक्ताई', धुळे रोड, अमळनेर ४२५४०१.
दूरध्वनी . (०२५८७) २२४१९

पू. सानें गुरुजी जन्मशताब्दी निमित्त

चेतश्री - प्रकाशने

★ छात्रालय / साने गुरुजी / रु. २०

★ चंद्रोदय / साने गुरुजी / रु. २५

★ देवाघरच्या फुलांनो / साने गुरुजी / रु. ३०

★ उमाळा / साने गुरुजी / रु. ३५

★ अमृताहुनी गोड / डॉ. ग. ना. जोशी

★ पू. साने गुरुजींचे तत्त्वचिंतन / डॉ. ग. ना. जोशी

★ साने गुरुजींचे दुर्मिळ छायाचित्र

☘ आगामी ☘

★ पू. साने गुरुजींचे साहित्य-चिंतन / संपा. वा. रा. सोनार

★ तत्त्वज्ञानाची कहाणी / अनु. साने गुरुजी
संपा. ग. ना. जोशी

(उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सहकार्याने)

★ साने गुरुजींचा पोवाडा / शिसोदे गुरुजी

: संपर्क :

चेतश्री प्रकाशन

मुक्ताई, धुळे रोड, अमळनेर ४२५४०१.